**" अहमदनगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०१८ प्रारुप अधिसूचनेचा मसुदा तसेच प्रारुप प्रभाग रचनेचे नकाशे अवलोकनास तसेच हरकती दाखल करणेसाठी पहावयास उपलब्ध "**

अ.नगर दि.२८ - अहमदनगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०१८ प्रारुप प्रभागरचनेच्या अधिसूचनेचा मसुदा तसेच प्रारुप प्रभाग रचनेचे नकाशे, अहमदनगर महानगरपालिका मुख्यालय तसेच अहमदनगर महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर दि.२७-८-२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आले आहेत. उपरोक्त प्रारुप अधिसुचनेवर हरकती दि.५-९-२०१८ पर्यंत कार्यालयीन वेळेत दाखल करणेबाबत कळविण्यात आले होते.

तथापी प्रारुप अधिसुचनेवर हरकती दि.५-९-२०१८ पर्यंत **कार्यालयीन कामकाजाचे दिवशी सकाळी १० ते दुपारी ३** या वेळेत खालील कार्यालयांमध्ये दाखल कराव्यात, असा बदल करण्यात आला आहे.

१) मा.आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका, मुख्यालय
२) सहा.आयुक्त, (निवडणूक), अहमदनगर महानगरपालिका
३) सर्व प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती कार्यालय

त्याचप्रमाणे प्रभाग रचनेच्या अधिसुचनेचा मसुदा महाराष्ट्र शासनाच्या दि.२७ ऑगस्ट २०१८ च्या राजपत्रात प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदरची प्रारुप अधिसुचना www.dgps.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध असून त्याची ऑनलाईन प्रिंट काढून घेता येईल.

---*---

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
जा.क्र.प्रसिध्दी विभाग - १०१
दिनांक : २८-८-२०१८

M.M. [signature]
प्र.प्रसिध्दी अधिकारी,
अहमदनगर महानगरपालिका.